नि.दि.दा. क्र.१४०००२७/२००९
निशाणी क्रमांक - ३९ खाली

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>

<u>शपथेवर उलटतपास पुढे सुरु -</u>
<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. गजभिये यांच्यामार्फत</u> :-

**२९.** माझे वडील २०१९ मध्ये मरण पावले. तसेच माझे आजोबा २००४ साली मरण पावले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांची मौजा मुसेवाडी येथील सर्वे क्र. १९७ व १८९ असे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सर्वे क्र. १९७ हे ३.०४ हे. आर. अशी होती व सर्वे क्र. १८९ ही ४ हेक्टरची होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १९७ च्या जमिनीपैकी १.५२ हे. आर. माझ्या वडीलांच्या नावे आली होती. तसेच सर्वे क्र. १८९ च्या जमिनीपैकी २ हे. आर. माझ्या वडीलांच्या नावे आली होती.

**३०.** हे मला माहित नाही की, शेतसर्वे क्र. १९७ व १८९ व घर क्र. ३१ व ३३ हे माझ्या आजोबांनी सन १९९४ च्या पूर्वी माझ्या वडीलांच्या, काका, आजी व त्यांच्या स्वत:मध्ये वाटणी केली किंवा कसे. हे मला माहित नाही की, शेती व घराचे भविष्यात वाद होऊ नये यामुळे माझ्या आजोबांनी घर क्र. ३३ माझ्या वडीलांच्या नावे केले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. ३१ माझ्या आजोबांनी प्रतिवादी क्र. १ च्या नावे केले होते. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. ३३ हे आधी माझ्या आजोबांच्या नावे होते व त्यानंतर ते ग्रामपंचायतीमधील माझ्या वडीलांच्या नावे करण्यात आले.

**३१.** हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. ३१ याआधी माझ्या आजोबांच्या नावे होते व त्यानंतर ते प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील जिवंत असतांना त्यांचा आजोबांच्या संपत्तीबाबत भाऊ-बहीण, आई-वडील यांच्याशी वाद झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचा वाद कोर्टामध्ये झाला नाही. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांनी वकीलांमार्फत प्रतिवादींना किंवा भावांना नोटीस पाठविले होते किंवा कसे.

**३२.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या नावे असलेली दोन्ही शेतजमीन व घर क्र. ३३ हे सध्या माझ्या व माझ्या भाऊ-बहीणांच्या नावे आहेत. हे मला आठवत नाही, शेतसर्वे क्र. १९७ व १८९ चा उर्वरीत हिस्सा माझ्या काकांच्या नावे कधी झाला. हे म्हणणे खरे आहे की, शेतसर्वे क्र. १९७ व १८९ चा उर्वरीत हिस्सा माझ्या काकांच्या नावे आहे. हे मला माहित नाही की, दोन्ही शेतीचे रजिस्टर्ड वाटणी पत्र माझ्या आजोबांनी

भविष्यात वाद होऊ नयेत म्हणून सन १९९४ मध्ये केले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, तोंडी वाटणीप्रमाणे माझ्या आजोबांनी घर क्र. ३३ माझ्या वडीलांच्या नावे व घर क्र. ३१ हे प्रतिवादी क्र. १ च्या नावे केले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी केलेल्या वाटणीबाबत मला पूर्वीपासून माहिती आहे.

**३३.** हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील त्यांच्या मृत्युच्या २५ वर्षांआधीपासून त्यांच्या हिश्श्यातली शेती वेगळी वाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील त्यांच्या परिवारासोबत घर क्र. ३३ मध्ये राहत होते व आजी-आजोबा घर क्र. ३१ मध्ये राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे काका आधीपासून बुट्टीबोरी, नागपूर येथे राहतात. मी दावा दाखल करण्याच्या आधी चौकशी केली नव्हती की, शेती व घर माझ्या वडीलांच्या नावे कसे आले.

**<u>प्रश्न</u>** - तुम्ही सदरच्या दाव्यासोबत दोन्ही शेत व दोन्ही घरांचे कागदपत्रे का जोडलेली नाहीत ?

**<u>उत्तर</u>** - सदरचा दावा मी घर क्र. ३१ करीता दाखल केला आहे. त्यामुळे इतर घर व शेतीचे कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नव्हती.

**३४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी दोन्ही घर व शेतीबाबत वाटणी केली असल्याने माझा घर क्र. ३१ मध्ये काही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी वाटपामध्ये घर क्र. ३१ प्रतिवादी क्र. १ ला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला वाटपाबद्दल माहिती असून सुद्धा मी प्रतिवादी विरुद्ध सदरचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्याआधी प्रतिवादींना खोटी नोटीस पाठवली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष दिली आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>.
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**(श्रीमती डी. सी. वोराणी)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
रामटेक.

रामटेक.
दिनांक - १९/०९/२०२५.